**नियमित फौजदारी खटला क्र.१२२/२०२४**
**सरकार/दिनकर**
**<u>नि.क्र.१६</u>**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ याची साक्ष.**

**मी शपथेवर सांगते कि,**

नाव – गजानन पंढरी बडोदे
वय – २९ वर्ष
धंदा – मजूरी,
रा. – बोपापूर, ता.नरखेड, जि.नागपूर

**सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता कुमारी एस.एस.गंगावणे मार्फत शपथेवर सुरु.**

**१.** फिर्यादी ही माझी पत्नी आहे. मी आरोपीला ओळखते. तो माझा मानलेला भाचा आहे. घटना हि दि.२६.०५.२०२४ रोजी मदना चौफुली येथे दुपारी सुमारे ३ वा. दरम्यान घडली होती.

२. घटनेच्यावेळी मी विहिरीच्या कामावर गेलो होतो. मी सांयकाळी सात वाजता परत आलो असता, माझ्या पत्नीने मला सांगितले की, आरोपीने मदना चौफुलीजवळ तिची ओढणी ओढली व मागून दोन्ही हाताने तिची छाती दाबली होती. माझ्या पत्नीने मला असे देखील सांगितले होते की, त्यावेळी तिचे आई वडील व भाउ तिथे आले होते. त्यानंतर तिचा भाउ तिला घेउन घरी आला. त्यानंतर मी ११२ क्रमांकावर फोन लावला व पोलिसांची गाडी माझ्या घरी आली. त्यानंतर पोलिस आम्हाला पोलिस स्टेशन जलालखेडा येथे घेउन गेले. तिथे माझ्या पत्नीने आरोपीविरुध्द तक्रार दिली. पोलिसांनी घटनेबाबत माझे बयान घेतले होते. आज न्यायालयात हजर असलेल्या आरोपीकडे बघून साक्षीदाराने त्याला ओळखले.

**सरतपास संपला**

**<u>उलटतपास आरोपीचे अधिवक्ता श्री.एस.एस.मानकर मार्फत</u>**

३. काशीनाथ बडोदे हे माझ्या नात्यात आहे. हे म्हणने खरे आहे की, आमची वडीलोपार्जित शेती व काशीनाथ बडोदे यांची शेती लागूनच आहे. हे म्हणने खरे नाही की, माझे वडील व काशीनाथ बडोदे यांच्यामध्ये शेतीच्या धु–याच्या पाण्यावरुन वाद होत होता. हे म्हणने खरे आहे की, आमचे व आरोपीच्या कुटूंबियांचे पटत नसून बोलने चालने बंद आहे. हे म्हणने खरे आहे की, आरोपी काथीनाथ बडोदे यांचा नातू आहे. हे मला माहिती नाही की, माझे वडील व काशीनाथ यांच्यात वाद होता किंवा कसे.

४. हे म्हणने खरे आहे की, मी घटना प्रत्यक्ष बघितलेली नाही. हे म्हणने खरे आहे की, मला माझ्या पत्तीने घटनेबद्दल सांगितले होते. हे म्हणने खरे आहे की, त्याप्रमाणे मी पोलिसांना बयान दिले होते. मी दिनेश बिसांदरेला ओळखतो. हे म्हणने खरे नाही की, घटनेच्यादिवशी दिनेश बिसांदरे हा माझ्या पत्नीला घेउन गेला होता. हे म्हणने खरे नाही की, घटनेच्यादिवशी माझ्या पत्नीला तिच्या आई वडीलाने व भावाने दिनेश बिसांदरेच्या गाडीवर बघितले होते. हे म्हणने खरे नाही की, माझ्या पत्नीचे अमित शेंबेकर सोबत मैत्रीचे संबंध होते. हे म्हणने खरे नाही की, त्याबाबत मला आरोपीने सांगितल्याचे माझ्या पत्नीला संशय होते. हे म्हणने खरे नाही की, माझ्या साळयाचे व दिनेश बिसांदरे यांचे भांडण झाले होते. हे म्हणने खरे नाही की, माझ्या पत्नीला आरोपीविषयी राग होता. हे म्हणने खरे नाही की, माझ्या पत्नीने घटनेविषयी मला खोटी माहिती दिली. हे म्हणने खरे नाही की, आम्ही जुन्या वादातून आरोपविरुध्द खोटी तक्रार दिली. हे मला माहिती नाही की, आरोपी रोजमजूरी करतो किंवा नाही. हे म्हणने खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नव्हती. हे म्हणने खरे आहे की, मदना ते जलालखेडा हा डांबरी रोड असून तेथे दळणवळण असते. हे म्हणने खरे आहे की, मदना शिवारात शेत्या आहेत. हे म्हणने खरे नाही की, घटनेच्यावेळी लोक शेतामध्ये काम करत होते. मदना ते पोलिस स्टेशन जलालखेडा यामध्ये अंतर ५ किलोमीटर आहे. मदना ते पोलिस स्टेशन जलालखेडा जायला एक तास लागतो. हे म्हणने खरे नाही की, मदना ते जलालखेडा रोडवर बसेस व ऑटो चालत असतात. हे म्हणने खरे आहे की, जलालखेडा हे मोठे गाव आहे. हे म्हणने

खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास संपला.</u>

<u>फेरतपास काही नाही</u>

**श्रवणोत्तर स्विकृत** **समक्ष**

**(पी.आर.पाटील)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**
**दिनांक –०७.०५.२०२५**

**(पी.आर.पाटील)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**

नियमित फौजदारी खटला क्र.१२२/२०२४
सरकार/दिनकर
<u>नि.क्र.१३</u>

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ याची साक्ष.**

**मी शपथेवर सांगते कि,**

नाव – अंकिता गजानन बडोदे
वय – २३ वर्ष
धंदा – मजूरी,
रा. – बोपापूर, ता.नरखेड, जि.नागपूर

**सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता कुमारी एस.एस.गंगावणे मार्फत शपथेवर सुरु.**

**१.** मी आरोपीला ओळखते. तो माझ्या पतीचा चुलत भाचा आहे. घटना हि दि.२६.०५.२०२४ रोजी मदना चौफुली येथे दुपारी सुमारे ३ वा. दरम्यान घडली होती.

२. घटनेच्यादिवशी मला माझ्या मैत्रीणीचा फोन आला की, तु मला जलालखेडा बस स्टॉपवर घ्यायला ये. त्यामुळे मी पायीपायी बोपापूर वरुन जलालखेडा येथे जाण्यास निघाली असता, मदना चौफुलीजवळ आरोपी हा दुचाकीने माझ्या मागे आला. आरोपीने माझी ओढणी ओडली होती व त्याने मागून दोन्ही हाताने माझी छाती दाबली होती व माझा विनयभंग केला होता. मी आरोपीला धक्का देउन जलालखेडा रोडने निघाली होती. तेव्हा वरुड वरुन माझे आईबाबा व भाउ दुचाकीने आले होते. त्यानंतर माझ्या भावाने मला घरी सोडून दिले. त्यानंतर सांयकाळी माझे पती कामावरुन घरी आले असता, मी त्यांना घटनेबाबत सांगितले. आम्ही त्याचदिवशी जलालखेडा पोलिस स्टेशन येथे जाउन मी आरोपीविरुध्द फिर्याद नोंदविली होती. आता मला मी दिलेली फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर फिर्यादला **नि.क्र.१४** देण्यात येते. आता मला मी दिलेली छापिल प्रथम खबर दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

सदर छापिल खबर खबरला **नि.क्र.१५** देण्यात येते. पोलिसांनी घटनेबाबत माझे बयान नोंदविले होते. आज न्यायालयात हजर असलेल्या आरोपीकडे बघून साक्षीदाराने त्याला ओळखले.

<u>**सरतपास संपला**</u>

<u>**उलटतपास आरोपीचे अधिवक्ता श्री.एस.एस.मानकर मार्फत**</u>

३. काशीनाथ बडोदे व माझे सासरे नातेवाईक आहे. हे म्हणने खरे आहे की, आमची वडीलोपार्जित शेती मौजा बोपापूर येथे आहे. हे म्हणने खरे आहे की, आमची व काशीनाथ बडोदे यांची शेती लागूनच आहे. हे मला माहिती नाही की, माझे सासरे व काशीनाथ बडोदे यांच्यामध्ये शेतीच्या धु–याच्या पाण्यावरुन वाद झाला होता किंवा कसे. हे म्हणने खरे आहे की, आमचे व आरोपीच्या कुटूंबियांचे पटत नसून बोलने चालने बंद आहे. बोपापूर ते जलालखेडा यामधील अंतर पाच ते सहा किलोमिटर आहे. हे म्हणने खरे आहे की, जलालखेडयाला जायला आधी मदना या गावी यावे लागते. हे म्हणने खरे आहे की, जलालखेडा ते मदना चौरस्ता असून त्यावरुन वाहतूक सुरु असते. सदर रस्ता हा डांबरी आहे. हे म्हणने खरे आहे की, मदना चौरस्त्याच्या आजूबाजूला शेती आहे.

**प्रश्न–** सदर शेतांमध्ये मजूर असतात ?

**उत्तर–** घटनेच्यावेळी शेतांमध्ये मजूर नव्हते.

४. हे म्हणने खरे आहे की, घटनेच्यावेळी चांलगी उन पडली होती. हे म्हणने खरे आहे की, उनामध्ये लोक गाडीने येजा करीत असतात. मला आरोपीच्या दुचाकीचा क्रमांक सांगता येणार नाही. हे मला माहिती नाही की, आरोपी हा रोजमजूरी करतो किंवा कसे. मी दिनेश बिसांदरे ला ओळखत असून ते माझे नंदई आहे. हे म्हणने खरे नाही की, घटनेच्यावेळी मला दिनेश बिसांदरे दुचाकीवर आले होते व मी त्यांच्या दुचाकीवर बसून घरी गेली होती. हे म्हणने खरे नाही की, मी माझ्या भावाला दिनेश बिसांदरेच्या गाडीवर दिसल्यामुळे तो माझ्यावर रागवला होता व तो तिथून निघून गेला होता. हे म्हणने खरे नाही की, मी घटनेच्यावेळी दिनेश बिसांदरेच्या गाडीवर बसून निघून गेली होती. हे म्हणने खरे नाही की, दिनेश बिसांदरे व माझे सबंध असून माझ्या पतीचे

व दिनेश बिसांदरे वाद झाले होते. हे म्हणने खरे नाही की, सदर बाब आरोपीने माझ्या पतीला सांगितल्याचा मला संशय होता. हे म्हणने खरे नाही की, त्यामुळे माझे व आरोपीचे पटत नाही. हे म्हणने खरे नाही की, माझा भाउ दिनेश बिसांदरे याच्याबद्दल माझ्या पतीला सांगेल याची मला भिती होती. हे म्हणने खरे नाही की, मी माझ्या पतीला खोटी घटना सांगितली होती. हे म्हणने खरे नाही की, मी व माझ्या पतीने संगमत करुन आरोपीविरुध्द खोटी तक्रार दिली. हे म्हणने खरे नाही की, घटनेच्यावेळी आरोपी कामावर गेला होता व तो घटनास्थळी हजर नव्हता. हे म्हणने खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सांगितल्याप्रमाणे घटना घडली नव्हती. मला मदन्यावरुन जलालाखेडयाला जायला कितीवेळ लागते हे मला माहिती नाही. हे म्हणने खरे आहे की, मदन्यावरुन जलालखेडा जवळच आहे. मदन्यावरुन जलालखेडयाला जायला १ तास लागते. हे म्हणने खरे नाही की, मी माझ्या पतीच्या सांगण्यावरुन आरोपीविरुध्द खोटी तक्रार दिली.

५. मी अमित शेंबेकर रा.एकदरा याला ओळखत नाही. हे म्हणने खरे नाही की,अमित शंबेकर हा माझा मित्र होता. हे म्हणने खरे नाही की, माझ्या पतीला आरोपीने अमित शेंबेकर व माझ्याविषयी सांगितलयाबाबत माझा सशंय होता. हे म्हणने खरे नाही की,मी आरोपीविरुध्द खोटी तक्रार दिली. हे म्हणने खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही**

**श्रवणोत्तर स्विकृत** **समक्ष**

**(पी.आर.पाटील)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**
**दिनांक –०७.०५.२०२५**

**(पी.आर.पाटील)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पि.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**लघुलेखकाचे नाव**– पी.एच. शिरभाते (श्रेणी–३)